ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 8 | APRIL - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

पर्यावरण संरक्षण व संवर्धनात स्वंयसेवी संघटनांची भूमिका

प्रा. विलास गायकवाड[१] , प्रा.डॉ.पंचशिल एकंबेकर[२]
[१]लोकप्रशासन विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय , वाशीम.
[२]लोकप्रशासन विभाग प्रमुख,वसंतराव नाईक महाविद्यालय , वसरणी, नांदेड.

प्रस्तावना :

पर्यावरण हा विषय आज जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनलेला आहे. त्यामुळे पर्यावरणशास्त्र या घटकाच्या अभ्यासाला अलीकडील काळात विशेष महत्व प्राप्त झाले आहे. इ.स. १९७२मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या याविषयावरिल जागतिक परिषदेनंतर विकसनशिल देशात पर्यावरणाच्या समस्याकडे विशेष लक्ष देण्यात सुरूवात झाली एखाद्या प्रदेशाचा आर्थीक विकास साधतांना पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे. याची जाणीव शासन व समाज यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे असे आढळुन आले आहे.

सामान्यपणे सभोवतलच्या परिस्थितीला पर्यावरण असे म्हणतात पृथ्वीग्रहापूरते व मर्यादित म्हणायचे म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागवर वातावरणात आणि पृथ्वीच्या अंतरंगात जे काही सामावलेले आहे त्या सगळयांचा समावेश पर्यावरणात होतो यामध्ये जमीन, हवा, पाणी निरनिराळया वायुराशी, सर्व वनस्पती, सर्व सजीव, खनिजे, नैसर्गिक वायु, खनिज तेल इ.चा समावेश होता त्या सर्वांची मिळुन तयार होणारी परिस्थिती म्हणजेच पर्यावरण होय. पर्यावरणाला इंग्रजी भाषेत Environment शब्दाने ओळखले जाते मुळत: फ्रेंच भाषेतील Environ या शब्दांचा अर्थच To Surround असा आहे To Surround म्हणजे सभोवतालची स्थिती असे मानले जाते व त्यातुनच सभोवतालच्या परिस्थितीला Environment पर्यावरण असे संबोधले जाते.

पर्यावरण संरक्षण ही मानवी आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक बाब असल्यामुळे पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी ही समाजातील प्रत्येक घटकाने स्वीकारवयास पाहिजे. पर्यावरण संरक्षण ही श्वासाइतकी महत्वाची गरज आहे. त्यामुळे भारत सरकारने नैसर्गिक साधनसंपत्ती व पर्यावरणातील घटकांचे संरक्षण व संवर्धन व करण्यासाठी काही नियम, कायदे केलेले आहेत व अंमलात आणलेलले आहेत. अशा कायदेशिर तरतुदी मुळे शाश्वत विकासाला अनुकुल परिस्थिती निर्माण झालेली आहे. राज्याच्या धोरण विषयक कायद्यात कलम, ४८ (अ) नुसार प्रत्येक -राज्याने आपल्याकक्षेतील पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे. कलम ५१ अ (९) नुसार नैसर्गिक पर्यावरणातील नद्या, ओढे, जंगले व वन्यप्राणी यांचे संरक्षण करणे व त्यांची गुणवत्ता वाढविणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. आज भारतात पर्यावरण संरक्षणासंबंधी २०० पेक्षा जास्त कायदे आहेत. या कायद्याच्या माध्यमातून शासन पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न करीत आहे.

शासनाबरोबरच पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी नागरिक, स्वंयसेवी संघटना व प्रसारमाध्यमे तसेच समाजातील सर्व संघटना, दबावगट यांचीही आहे. यातील नागरिक आणि स्वंयसेवी संघटना पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहेत. कारण नागरिक हा त्याचा उपभोग्य घटक आहे. त्यामुळे नागरिकांची जबाबदारी अधिकच आहे.

स्वंयसेवी संघटनांची भूमिका :

पर्यावरण संरक्षण व संवर्धनात नागरिकांच्या भूमिकेबरोबरच स्वंयसेवी संघटनांची भूमिका अधिकच महत्वपूर्णआहे. कारण शासनाचे प्रयत्न जिथे अपुरे पडतात, तिथून स्वंयसेवी संघटनांचे कार्य सुरू होते. आज जागतिक पातळीवर अनेक स्वंयसेवी संघटना पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. पर्यावरणाचे दुष्परिणाम, जलप्रदूषण, वायूप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, अवेळी पाऊस, चक्रीवादळे, पावसाचे घटते प्रमाण, हिमजंगले, त्याचबरोबर ग्लोबल वार्मिंग असे अनेक दुष्परिणाम पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे समोर आल्याचे दिसून येत आहे. भारतामध्ये आसाम सायन्स सोसायटी, बीएआयएफ डेव्हलपमेंट रिसर्च फाऊंडेशन, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, सीईई, सीएसई, क्लिन अहमदाबाद अभियान, सीपीआर एनवायरमेंटल एज्युकेशन सेंटर, दशोली ग्राम स्वराज्य मंडळ, दर्पन ॲकेडमिक ऑफ परफॉरमिंग आर्टस,

डेव्हलपमेंट अल्टरनेटिव्हज, गांधी पिस फाऊंडेशन, ग्रीन फ्युचर फाउंडेशन, इंडियन असोसिएशन फॅार एनव्हारमेंटल मॅनेजमेंट, आयएनटीएसीएच, जन्मू आँड काश्मिर एनव्हारमेंट अँड वेस्टलँड डेव्हलपमेंट सोसायटी, कल्पवृक्ष, लढाख इकॉलॉजी डेव्हलपमेंट ग्रुप, मद्रास नॅचरिलिस्ट सोसायटी, नर्मदा बचाव आंदोलन, निलगिरी वाईल्ड लाईफ अँड एनव्हारमेंट असोशिएसन, ओरिसा एनव्हारमेंटल सोसायटी, राजस्थान एनव्हारमेंट प्रिझरव्हेशन सोसायटी, रामकृष्ण मिशन लोकशिक्षा परिषद, टेरि, तरूण भारत संघ, टायगर लिंक, उत्तराखंड सेवानिधी, वनराई, वातावरण,वर्ल्ड वाईल्ड फंड फॉर नेचर अशा अनेक स्वंयसेवी संघटना पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने कार्य करीत असल्याचे दिसून येते. अशा या संस्थांच्या भुमिकेचा विचार करणे गरज निर्माण झाली आहे.

०१) Asam Science Society (आसाम सायन्स सोसायटी)

आसाम सायन्स सोसायटीची स्थापना १९५३ ला झाली. या संस्थेच्या ७५ शाखा आहेत. पर्यावरण शिक्षण व प्रशिक्षण शिक्षक व विद्यार्थी यांना शिबीराच्या माध्यमातून देणे हा या संस्थेचा उद्देश आहे.

०२) BAIF Development Research Foundation (बाईफ विकास संशोधन संस्था)

या संस्थेची स्थापना १९६७ रोजी उरली कांचन जि. पुणे येथे झाली. जमीन, पाणी आणि भाजीपाला अशा साधनांचे पुनरूज्जीवन करून गरीबाच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्याकरिता ही संस्था स्थापन करण्यात आली आहे. त्यांनी वृक्षारोपन, कृषी, जंगल व पडिक जमीन विकास आणि प्रतिकूल परिस्थितीत जिवंत राहण्याच्या क्षमतेबद्दल संशोधन केले आहे. त्यांच्याद्वारे जंगल वाढ, पडित जमीन आणि पाणलोट व्यवस्थापनाचे सल्ला केंद्र सुरू केले आहे.

०३) Bombay Natural History Society (मुंबई नैसर्गिक इतिहास संस्था)

या संस्थेची सुरूवात सप्टे. १८८३ ला मुंबई येथे झाली. भारतीय उपखंडामधून नैसर्गिक साधनांचा इतिहास व त्यातील माहिती संकलित करणे हा त्यांचा उद्देश आहे. तसेच पर्यावरण ज्ञानाचा प्रसार करणे क्षेत्रिय सहल, साहित्य आणि प्रदर्शन व जंगली जीवनासंदर्भात संबधित समस्येचा अभ्यास करणे पक्षी स्थलांतरावरती क्षेत्रीय संशोधन प्रकल्प ही संस्था चालविते. भारतीय वन्य जीननातील धोरणांचा अभ्यास करून पर्यावरण शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाची गरज सांगण्याचे कार्य ही संस्था करते.

०४) Centre for Environmental Education (पर्यावरण शिक्षण केंद्र)

या संस्थेची स्थापना १९८४ ला अहमदाबाद येथे झाली. पर्यावरणाच्या समस्या शोधणे व त्यावरती उपाय सूचवून जनजागृती करण्याचे काम ही संस्था करते. मुख्यत्वे समाजात पर्यावरण जनजागृती निर्माण करणे हा उद्देश या संस्थेचा आहे. त्यासाठी पर्यावरणीय पुस्तके प्रकाशित करणे, पोस्टर प्रदर्शन भरविणे, शैक्षणिक योजनांच्या माध्यमातून पर्यावरण शिक्षणाचा प्रसार करणे हे या संस्थेचे मुख्य कार्य आहे.

०५) Centre for Science and Environment (विज्ञान व पर्यावरण केंद्र)

उपयुक्त, पाणी, जमीन, जंगल, प्राणी, प्रदूषणाचे क्षेत्र, शैक्षणिक कार्य व यावर संशोधनाचे कार्य ही संस्था करते. त्यासाठी अभ्यास सहल काढणे, वेगवेगळ्या मुद्यांवर चर्चासत्र भरविणे हे काम ही संस्था करते. सभा आणि कार्यशाळा आयोजित करून पर्यावरण जनजागृती ही संस्था करते.

०६) CPR Environmental Education Centre (सिपीआर पर्यावरणात्मक शिक्षण केंद्र)

ही संस्था चेन्नई येथे स्थापन करण्यात आली. पर्यावरणाचे मुलभूत शिक्षण व त्यानुषंगाने वेगवेगळे प्रकल्प बनविण्याच्या हेतूने ही संस्था स्थापनक करण्यात आली. पर्यावरण कायदयाचे मार्गदर्शन करणे, पर्यावरणाचा प्रभाव व व्यवस्थापनाचा अभ्यास करणे या दृष्टिने ही संस्था कार्ये करते.

०७) Gandhi Peace Foundation (गांधी शांती संस्था)

या संस्थेची स्थापना १९७९ मध्ये दिल्ली येथे झाली प्रामुख्याने ग्रामीण क्षेत्रातील पर्यावरण कार्याला प्रेरणा देण्यासाठी या संस्थेची स्थापना झाली. पर्यावरणाची माहिती गोळा करणे. पर्यावरण कार्यशाळा चर्चासत्रे व तज्ज्ञांचे मार्गदर्शन करणे ही संस्था करते.

०८) Green Future Foundation (हरित भविष्य संस्था)

या संस्थेची स्थापना १९८७ ला महाराष्ट्रात पुणे येथे झाली. पर्यावरण संरक्षण कार्याच्या दृष्टिने प्रेरणा देण्याकरीता ,ऊर्जा संवर्धन आणि प्रदुषण नियंत्रण करण्याच्या हेतूने या संस्थेची स्थापना झाली. तरुणाकरीता पर्यावरण संरक्षण शिबीराचे आयोजन करणे. वन औषधीची महत्व तरुणापर्यंत पोहचविणे हे कार्ये ही संस्था करते.

०९) Indian Association for Envionmental Management (पर्यावरण व्यवस्थापनाकरीता भारतीय संघटना)

१९६३ ला नागपूर या ठिकाणी पर्यावरणाचे लोकांना शिक्षण देणे, पर्यावरण संवर्धनाला प्रेरणा देणे, पर्यावरणाच्या ज्ञानाच्या प्रसार करणे या हेतूने या संस्थेची स्थापना करण्यात आली.

१०) Kalpvriksh (कल्पवृक्ष)

ही संस्था १९७१ रोजी दिल्ली येथे हरित क्षेत्राचा विनाश रोखण्याकरीता स्थापन करण्यात आली पर्यावरण विषयक ज्वलंत प्रश्न हाताळण्याकरीता या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेने नेचर क्लब ची स्थापना करुन पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी शाळा व महाविद्यालयामध्ये मार्गदर्शन करण्याचे कार्ये करते. दिल्लीतील हवाप्रदुषण डेहराडून जिल्हयातील महान कार्ये अशा वेगवेगळया ठिकाणी ही संस्था कार्ये करते.

११) Madras Naturalists Society (मद्रास नॅचरलीस्ट संस्था)

पर्यावरण समस्येचा अभ्यास करणे तसेच पर्यावरणावर चर्चासत्रे, शिबीरे आयोजीत करणे या हेतूने १९७९ मध्ये चेन्नई येथे या संस्थेची स्थापना करण्यात आली. ऊर्जेची नविन साधणे शोधणे, जलप्रदुषण व जंगल तोड थांबविणे यावर हि संस्था काम करते.

१२) नर्मदा बचाव आंदोलन

या आंदोलनाची सुरुवात १९८६ ला मेधा पाटकर यांच्या नेत्वृवाखाली झाली. नर्मदा नदीच्या प्रदुषणावर नियंत्रण ठेवण नर्मदा धरण्याच्या बांधकामास तढा देणे या उद्देशाने हे आंदोलन उभे राहिले आहे.

१३) Ramkrushna Mission Lokashiksha Parishad

ग्रामीण पर्यावरण जनजागृती करणे लोकांना स्वयंपुर्ण बनविणे या दृष्टिने १९५२ मध्ये ही संस्था स्थापन करण्यात आली. क्षारयुक्त पाण्यापासुन जमीन संरक्षणाचे कार्ये करणे, पडित जमीन पुर्नजिवीत करणे, जंगल क्षेत्रात लोक वस्तीचे रक्षण करणे, धुर विरहीत चुलींचा उपयोग करणे, गोबरगॅस युक्त शौचालय प्रकल्प , सौर ऊजेचा वापर पर्यावरण युक्त शेती या दृष्टिने ही संस्था कार्ये करते.

१४) Tiger Link (टायगर लिंक)

या संस्थेच्या कार्याची सुरुवात इ.स. १९९५ ला दिल्ली येथे वाल्मिक थापर यांच्या नेत्वृत्वाखाली करण्यात आली. वाघांचे संरक्षण करणे. त्याच बरोबर पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे या उद्देशाने ही संस्था कार्ये करते.

१५) Vanrai (वनराई)

या संस्थेची स्थापना इ.स. १९८२ ला पुणे येथे झाली. पर्यावरण संरक्षण व जंगल वाघ तसेच ग्रामीण क्षेत्राचा विकास या हेतूने ही संस्था कार्य करीत आहे. महाराष्ट्र , गुजरात व राज्यस्थान या राज्यामध्ये ही संस्था कार्ये करते.

१६) Vatavaran (वातावरण)

ही संस्था दिल्ली येथे स्थापन करण्यात आली आहे. कचरा संकलन करणे व त्याची योग्य विल्हेवाट लावणे तसेच त्यामाध्यमातून पर्यावरण स्वच्छता ठेवणे या दृष्टीने ही संस्था कार्ये करते.

१७) The Energy and Resourees Institute (टेरी)

ही संस्था १९७४ ला स्थापन करण्यात आली. नैसर्गिक संसाधनाचा सुसहय वापर व पर्यावरणात्मक धोरण विकसित करणे या हेतूने ही संस्था कार्ये करते.

अशा अनेक संस्था संपुर्ण भारतभर पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरीता काम करीत आहेत.

स्वंयसेवी संस्थाच्या भूमिकेचे मूल्यमापन :

जागतिकीकरण व नवउदारमतवादी बाजारपेठीय कार्पोरेट अर्थव्यवस्था आणि बहुराष्ट्रीय कंपन्याचे जल जंगल, जमीन या वरील आक्रमण यामुळे पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. शहराची होणारी झपाटयाने वाढ, औद्योगिकरण, जंगलतोड, नदयाच्या पाण्याचा गैरवापर, विषारी रासायनिक द्रव्य यामुळे भारताच्या परिसंस्थेमधील प्रचंड ढवळाढवळ होत आहे. प्रचंड प्रदुषणाने आणि परिसंस्थेचे उध्वस्तिकरण याबाबतीत पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थाची फार मोठी अडचण झालेली आहे. वर उल्लेख केलेल्या पर्यावरण क्षेत्रातील संस्थाचे स्वरुप प्रबोधनात्मक आणि जनजागृतीचे आहे. नर्मदा बचाव आंदोलन, चिपको आंदोलन, आणि पर्यावरणाचे प्रश्न उपस्थित करणाऱ्या श्रीमती अरुंधती रॉय या सारख्या व्यक्ती आणि त्यांच्या संस्था, बाजारपेठीय कार्पोरेट आक्रमनाला रोखु शकलेल्या नाहीत. नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाठकर यांनी अनेक सत्याग्रह केले वेगवेगळया प्रकाराची आंदोलने चालवली तरी फारसा उपयोग झालेला नाही. विस्थापितांचे प्रश्न गंभीर बनले आहेत ओरिसा, छत्तीसगड या प्रदेशात सुरु असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आक्रमणा विरुध्द अरुंधती रॉय आणि त्यांच्या सहकाऱ्यांने आवाज उठवले तरी केंद्र सरकाच्या वरदहस्ताखाली हे आक्रमण चालुचं आहे. त्यामुळे आदिवासी प्रदेशातील जंगल आणि जमीनीचे प्रश्न गंभीर बनलेले आहेत. खाण उद्योगामुळे ओरिसा, छत्तीसगड, मध्यप्रदेश या भागातील प्राणी आणि मानवाच्या अस्तित्वाचे प्रश्न गंभीर झालेले आहेत. महाराष्ट्रातील किबंहुना भारतातील सर्व नदयाचे पाणी, शहरातील सांडपाणी आणि कारखान्यातील रासायीनक कचरा यामुळे केवळ पाणी प्रदुषीतच नाही तर विषारी झालेले आहे. याबाबत पर्यावरण क्षेत्रातील स्वंयसेवी संस्था जनजागृतीचे काम करीत आहेत. परंतु शासन मोठे उद्योजक, कारखान्याचे मालक आणि नोकरशाही यांची युती असल्याने विकासाच्या नावाखाली हे आक्रमण चालुच आहे.

पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या बहुतेक स्वंयसेवी संघटना जाणिव जागृतीचे कार्य करणाऱ्या संस्था आहेत.
या संस्था प्रदुषणा विरुध्द जनजागरण करण्याचे काम करतात. या संस्थाकडे पर्यावरणावर होणारे आक्रमण रोखण्याची क्षमता नाही. एक गोष्ट खरी आहे की, कल्पवृक्षासारखी संस्था किंवा नर्मदा बचाव आंदोलन अशा संस्थांनी जनतेमध्ये कॉपोरेट कंपन्याच्या आक्रमणाबद्दल मोठया प्रमाणात जागृती आणण्याचे कार्य केले त्यामुळे केरळ, आंध्रप्रदेश आणि पश्चिम बंगाल सारख्या राज्यात धोकादायक प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील जैतापूर प्रकल्प असो किंवा देशातील इतर भागातील प्रकल्प असो त्या विरुध्द जनता उठाव करीत आहे. दिल्ली सारख्या ठिकाणी अनेक स्वयंसेवी संस्था कार्य करीत असतांना सुध्दा हवेच्या प्रदुषणांने संपुर्ण दिल्लीला विळखा घातला आहे. भविष्यात तेथील नागरीक सामान्यपणे जीवन जगु शकतील की नाहीत या विषयी शंका निर्माण होत आहे. पंजाब, हरियाणात शेतीमधील रासायनिक पदार्थाच्या वापरामुळे कॅन्सरसारख्या रोगाचे प्रमाण इतके वाढले आहे की, ईलाजासाठी दिल्ली जाण्यासाठी कॅन्सर एक्सप्रेस रेल्वे सरकारला सुरु करावी लागली आहे.

पर्यावरण क्षेत्रातील या संस्थांनी पर्यावरण जनजागृतीचे प्रयत्न अधिक तीव्र केले तर यावर मात केली जावू शकते. त्यासाठी पर्यावरण विषयक कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करावे. पर्यावरण दिंडी , वृक्षारोपणाचे कार्यक्रम, निबंध स्पर्धा, व्याख्यानमाला, वक्तृत्व स्पर्धा, एक व्यक्ती एक झाड, वाहनांचा विवेकी वापर करणे, परिसर स्वच्छता, प्लास्टीक व कॅरीबॅग वापर टाळणे, नदी व समुद्रातील पाण्याची स्वच्छता ठेवणे या विषयी समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत शेवटच्या व्यक्तिपर्यंत जावून स्वयंसेवी संघटनांना कार्ये करावे लागेल, तेंव्हा पर्यावरण संरक्षणात त्यांची भूमिका यशस्वी झाली असे म्हणता येईल.

संदर्भ

१) विराट प्रा. तु. म. , पर्यावरण शास्त्र एक अभ्यास
२) येडले डॉ. गोविंद , संपा., पर्यावरण संरक्षण काळाची गरज, मिसबाह प्रकाशन , नांदेड, फेब्रुवारी २०१६
३) घारपुरे डॉ. विठ्ठल, पर्यावरण शास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड क. पब्लिशर्स, नागपुर, जुन २०१४
४) http://www.ambedkar.org/news/NGOS htm.
५) http://www.ngowatch.org/ngos.php.? c=४